आता ईश्वर जर साकार नाही तर त्याने वेदाचा प्रकाश कसा केला? असा प्रश्न उद्‌भवतो. तालु, जीभ, ओष्ठ ज्या अधिकरणी नाहीत, तेथून शब्दोच्चार कसा घडेल? यास उत्तर सोपे नाही. ईश्वर सर्वशक्तिमान आहे. मग सहजच मुखादी इंद्रियांची अपेक्षा संभवत नाही. शब्दोच्चारास संयोगादी कारणे अल्प शक्तीला लागतात. किंच–

अपाणिपादो जवनो ग्रहीता
पश्चत्यचक्षुः स शृणोत्यकर्णः।
स वेत्ति विश्वं न च तस्यास्ति वेत्ता
तमाहुरग्र्यं पुरुषं पुराणम्।।

(मुण्डकोपनिषद्) (श्वेताश्वतर उ.३/१९)

आपण सर्व कबूल करतो की हातांवाचून ईश्वराने सर्व सृष्टीची रचना केली, मग मुखावांचून वेदाची रचना का होणार नाही?

कोणी अशी शंका घेईल की, वेदरुपी पुस्तके रचणे हे शक्य काम आहे. याकरिता ईश्वराच्या साक्षात् कृतीची कल्पना करणे नको. परंतु या स्थळी जरा विचार केला पाहिजे. विद्या आणि जडसृष्टी रचना यांच्यामध्ये महदंतर आहे. केवळ जडसृष्टीरचना परमेश्वराने केली, यावरुन त्याचे मोठे माहात्म्य सिद्ध होत नाही. कारण विद्येपुढे जडसृष्टीरचना कांहीच नाही. म्हणून विद्येचे कारणही ईश्वरच आहे, असे मानले पाहिजे. इतर क्षुद्र पदार्थ निर्माण करून विद्यारुपी इवेद ईश्वर उत्पन्न करणार नाही असे कसे घडेल?

आता वेदविद्या ईश्वरापासून उत्पन्न झाली आहे म्हणजे काय? असा प्रश्न येतो, त्यास उत्तर असे आहे की, आदिविद्या म्हणजे सर्व विद्येची मात्र मूलतत्वे ईश्वरापासून प्रकाशित झाली आहेत. त्याचा विशेष प्रभाव मनुष्याचे हातून अभ्यासाने होतो.

आता ही आदिविद्या म्हणजे वेद ईश्वराने प्रकाशित केले आहेत याची प्रमाणे–

१. प्रथम प्रमाण हे की वेदांत पक्षपात नाही. ईश्वर सर्व जगावर अनुग्रह करणारा आहे. म्हणून तत्प्रणीत जो 'वेद' या मध्ये पक्षपात असणे हे कसे साजेल? तसेच ईश्वर न्यायी आहे, म्हणून पक्षपात संभवत नाही.

ज्यात पक्षपात आहे, ती विद्या ईश्वर प्रणीत नाही. यास उदाहरण वेदाची भापा कोणती? संस्कृत ना? संस्कृत भापा वेदाची आहे, हा पक्षपात नव्हे का? असे कोणी म्हणेल, तर हे म्हणणे बरोबर नाही. संस्कृत भापा ही सर्व भापांचे मूल

आहे. इंग्रजी सारख्या भाषा तिजपासून परंपरेने उत्पन्न झाल्या आहेत. एक भाषा दुसऱ्या भाषेचा अपभ्रंश होऊन उत्पन्न होते, 'वयं' या संस्कृत शब्दामध्ये 'यम्' यांचे संपृसारण होऊन इंग्रजी 'वुई' हा शब्द उत्पन्न झाला. तसेच 'पितर' यापासून 'पेतर' व 'फादर', 'यूयं' यापासून 'यू', 'आदिम' यापासून 'आदम' असे अपभ्रंश कांही नियमांस अनुसरुन होतात व कांही अपभ्रंश यथेष्टाचाराने होतात. याविषयी विशेष सांगणे नको. ईश्वरात जसा अनंत आनंद आहे, तसाच संस्कृत भाषेत अनंतानंद आहे. ह्या भाषेंसारखी मृदू, मधुर, व्यापक सर्व भाषेची माता, अशी दुसरी कोणती भाषा आहे?

आता कोणी म्हणेल की ही भाषा एकाच देशांतील का असावी? पण पाहा संस्कृत भाषा एका देशाची नाही. सर्व भाषेची मुळे संस्कृतात आहेत म्हणून सर्व ज्ञानाचे मूळ जे वेद, ते संस्कृतात आहेत. ज्या ज्या देशांत संस्कृत भाषा शिरली आहे, त्या-त्या देशांतील विद्वान लोकांच्या मनाचे आकर्षण करीत आहे व ही दुसऱ्या भाषेच्या मातृस्थानी आहे, अशी योग्यता मिळवीत आहे.

पुनरपि वेदांतीलच कांही कांही मुख्य गोष्टीचा प्रचार जगतातील सर्व देशांत चालत आहे. यहूदी लोक नेहमी वेदी करीत व यज्ञ करीत. हे ज्ञान त्यांना कोठून प्राप्त झाले? त्यांना होता, उद्गाता, ब्रह्मा यांच्या व्यवस्थेने यज्ञ करणे हे ठाऊक नव्हते, यात विशेष नाही. आम्हां आर्य लोकांच्या रीतीने त्यांना विस्मरण पडले. पारशी लोकही अग्यारीत अग्निपूजा करतात. हा आचार वेदमूलक नव्हे काय?

वेदामध्ये पक्षपात नाही, हे स्पष्ट आहे. यहूदी लोक अन्य लोकांचा द्वेष करण्यास शिकले होते. मुसलमान लोक अन्य लोकांस काफर म्हणतात व त्या समजुतीस त्यांच्या धर्म पुस्तकांत उत्तेजन आहे. अशा प्रकारच्या अभिमानास वेदांत उत्तेजन नाही. म्हणून वेद ईश्वरप्रणीत आहेत, असे सिद्ध होते.

२) **दुसरे**-वेद हा सुलभ ग्रंथ आहे. अर्वाचीन पंडित अवच्छेदक अवछिन्न पदे घालून मोठे लांब परिष्कार करतात, पण त्या परिष्कारांत शब्दजाल मात्र असते. विशेष अर्थगांभीर्य नसते. तसा वेद ग्रंथ नाही.

आता कोणी म्हणेल की, दुर्बोधामुळे परिष्कारातील काठिण्यपांडित्य सूचक आहे. तर कावळे परस्परांत जेंव्हा भांडतात, तेंव्हा त्यांच्या भाषेचा अर्थ कोणास समजत नाही, म्हणून दुर्बोधामुळे काकभाषेत पांडित्य संभवते काय? अस्तु

वाक्सुलभता व अर्थ गांभीर्य हे सामर्थ्याचे प्रमाण आहे. ज्ञानप्राप्ती क्लेशा वाचूंन होणे हे ईश्वर कृतिदर्शक आहे. उगीच शक्यता अवच्छेदक शक्यता अवच्छिन्न म्हणण्याबद्दल सुलभ शब्दांनी वात्स्यायनांनी प्रतिपादन केले ते पहा :-

प्रमातुः प्रमाणानि
प्रमेयाधिगमार्थानीति शक्यप्राप्तिः।।

(न्या.वा.भाष्य १/१/३२)

या सुलभतेमुळे वात्सायन महापंडित आधुनिक शास्त्रांपेक्षा वेडा ठरतो काय? नाही. मग वात्सायनाच्या भापेपेक्षा वेदाची भापा लक्षपट सोपी आहे.

३) तिसरे प्रमाण असे आहे की, वेदापासून अनेक विद्या व शास्त्रे सिद्ध होतात. जसे -

नमोऽस्तु रुद्रेभ्यो ये दिवि येषां वर्षमिषवः।
तेभ्यो दश प्राचीर्दश दक्षिणा दश
प्रतीचीर्दशोदीचीर्दशोर्ध्वाः।
तेभ्यो नमो अस्तु ते नोऽवन्तु तेनो मृडयन्तु
ते यं द्विष्मो।
यश्च नो द्वेष्टि तमेषां जम्भे दध्मः।।

(य.स.अ.१६)(मं.६४)

मनुष्याने केलेल्या पुस्तकात एका विपयाचे प्रतिपादन असते, जैमीनीच्या सर्व मताचा ओघ एक धर्म व धर्मी या विपयी विचार करण्यात संपला. कणादाच्या मनाचा ओघ पट् पदार्थाच्या विवेचनाच्या विचारांत संपला. तसेच वैद्यक ग्रंथ, व्याकरणभाष्य व योगशास्त्र यांची व्यवस्था करण्यातच पतंजलीचे सर्व आयुष्य संपले. परंतु वेद हे अनंत विद्याचे अधिकरण आहेत. म्हणून वेद मानुपकृतीचे नव्हते. ते ईश्वर प्रणीत आहेत. आता सर्व विद्यांचे अधिकरण वेद आहेत. म्हणजे सर्व विद्यांच्या मूळतत्वाचे दिग्दर्शनमात्र वेदांत आहे. उदाहरण घेऊ या.

वाराह्योपानहोपनह्यामि.।
सहस्त्रारित्रांशतारित्रां नावमित्यादि.।।

(ऋ.१/१६/५)

एकाच मे तिस्रश्च मे पंच च मे।।

(य.सं.)(१८/२४)

प्रथम उदाहरणांत रचना विशेपाचे निरुपण केले आहे. दुसऱ्यांत नौका शास्त्राचे निरुपण केले आहे, तिसऱ्यांत गणित शास्त्राचे निरुपण आहे.

आता कोणी म्हणेल की, ईश्वराने सर्व विद्येची मूळतत्वेच का प्रकाशित केली? व साद्यंत विद्यांचे व कलांचे विवरण का केले नाही? त्यास माझे म्हणणे आहे की, ईश्वराने मनुष्यमात्राच्या बुद्धिव्यापारास तसेच बुद्ध्युन्नतीस अवकाश ठेवला.

४) चौथे कोणी अशी शंका घेईल की, अनेक पुरुपघटित वेद आहेत. यास उत्तर, अनेक पुरुपघटित वेद असते तर

वेदांत एकवाक्यतादि गुण आहेत त्याची व्यवस्था कशी होणार?

आता पूर्वकाळी निरनिराळ्या विद्या भरतखंडामध्ये वेदाच्या योगाने प्रसिद्ध होत्या. म्हणून त्या विद्या ही नष्ट झाल्या. मुसलमानांनी लाकडे जाळण्याबद्दल पुस्तके जाळली, जैनांनी असाच अनर्थ केला. सन १८५७ सालच्या सुमारास दंगा झाला.त्यावेळी कोणी एका युरोपियनाने अमृतराव पेशवे यांचे मोठे पुस्तकालय जाळले. अशी लोकवंदता आहे. यावरुन किती विद्या नष्ट होत आली असेल? याचा विचार करा.

उपरिचर म्हणून राजा होता. तो नेहमी भूमीस स्पर्श न करिता हवेतून हिंडत असे.पूर्वीचे लोक विमानातून लढाया करीत. त्यास विमान रचण्याची उत्कृष्ट माहिती होती. विमान रचनेविपयी मी एक पुस्तक पाहिले आहे. अहो त्यावेळी दारिद्र्याच्या घरी देखील विमाने होती. या व्यवस्थेपुढे आगगाडीची प्रतिष्ठा ती काय?

५) पाचवे, वेद सनातन सत्य आहेत. त्यास त्याचे सामर्थ्य फार मोठे आहे. पाहा, शार्मण्य(जर्मन) देशांतील लोक वेदांचे अवलोकन करून त्यांची कीर्ती व गुणानुवाद गात बसले आहेत. या प्रमाणे सर्व देशांतील विद्वानांच्या मनाचे आकर्पण वेदातील सत्याच्या सामर्थ्याने होत आहे. आता एकंदरीत सत्यता, एकवाक्यता, सुगमरचता, भापालावण्य, निःपक्षपात, सर्व विद्यामूलकत्व हे गुण वेदांत मात्र संभवतात. यावरून वेद ईश्वरप्रणीत आहेत. अलीकडील आमचे इंग्रजी शिकलेले लोक इंग्रजी ग्रंथातील लटपट पाहून ती खरी आहे, असे मानतात हे बरे नव्हे. आमचे वडील बंधू शास्त्रीलोकपरंपरा न सोडण्याविपयी हट्ट धरून बसतात, ते ही बरे नाही! कारण आगगाडीतून प्रवास करतांना परंपरेचा हट्ट कोठे जातो? कां बाप अंधळा असला म्हणजे पुत्राने पण आपले डोळे फोडावेत? मतलबापुरती परंपरा स्वीकार केल्याने धर्म प्रबंधांत सर्व घोटाळा झाला आहे, या घोटाळ्याचा विचार केला म्हणजे काळीज फाटते.

पाहा बरे, जिकडे तिकडे जातिविभाग होऊन आपण निर्बळ होऊन गेलो आहोत. पूर्वी आर्य लोकांमध्ये 'शतघ्नी' म्हणजे तोफा होत्या व 'भुशुंडी' म्हणजे बंदुका होत्या. हे सर्व आमचे बळ कोठे गेले? 'अग्नी' अस्त्रादिकांचा लोप कसा झाला? हल्लीचे पंडित लोक असे म्हणतात की केवळ मंत्रोच्चाराच्या सामर्थ्याने पूर्वी आग्नेयास्त्रादी घटत होते;

पण असे नाही. मंत्राच्या योगाने अग्नी उत्पन्न होत होता असे मानावे, तर मंत्र म्हणणारा कसा जळत नव्हता ? तर असे नव्हे, मंत्र म्हणजे विशेष अक्षर! अनुपूर्वीत म्हणजे शब्दात व अर्थात संकेत मात्र संबंध आहे. सामर्थ्य नाही. जसे अग्नी शब्दात दाहकत्व नाही. तद्वत मंत्र जपल्याने नुसता काळक्षेप होतो. व्रतबंधाचे वेळी मुलाचे अल्प सामर्थ्य असल्यामुळे एकच मंत्र वारंवार त्यास म्हणावा लागतो. म्हणून हा मंत्राचा खरा विनियोग नव्हे! मंत्र म्हणजे विचार! राजमंत्री म्हणजे विचार करणारा! हाच अर्थ खरा असे न मानावे. राजमंत्री किंवा अमात्य म्हणजे राजाची माळा घेऊन जप करणारा असा अर्थ करावा लागेल. मंत्री शब्दाचा अर्थ जप करणारा नव्हे, परंतु विचार करणारा हा होय. तर वेदमंत्राचा खरा विनियोग म्हणजे बुद्धिवैशद्य, बुद्धयुन्नति, बुद्धिप्रकाश, बुदिद्धसामर्थ्य ही उत्पन्न करणे हा आहे. अशा प्रकारचे सामर्थ्य पूर्वी आर्य लोकांत होते. ते एकच मंत्र घेऊन जपत बसत नसत. परंतु अनेक मंत्रांची मीमांसा करीत. म्हणूनच वारुणास्त्र, अग्नेयास्त्रादिकांची त्यास माहिती असे. म्हणजे पदार्थाच्या गुणांची माहिती करून त्याची विशेष योजना ते करीत होते. विशल्यौपधी म्हणून त्यास एक औपधी माहित होती. कसलीही जखम असो या औपधीने लवकर भरून येत असे. पूर्वी बंगालकडे येथील लोक आर्य लोकांच्या वैद्यक विद्येची थट्टा करीत असत. परंतु डॉक्टर महेंद्रनाथ सरकार यांसारख्या विद्वान पंडितांनी चरकसुश्रुता सारख्या ग्रंथाचे उज्जीवन केले. येणे करुन इंग्रजी शिकलेल्या लोकांचा भ्रम उडाला, महेंदनाथाने प्राचीन आर्य ग्रंथाचे उज्जीवन करण्याकरिता पुष्कळ द्रव्य मिळविण्याचा उद्योग चालविला आहे, हे त्यास भूपण मोठे आहे. पदार्थज्ञानाविपयी वेदांत मोठी दक्षता आहे.

अग्निवायुरविभ्यस्तु त्रयं ब्रह्म सनातनम्।
दुदोह यज्ञसिद्धयर्थमृग्यजुः सामलक्षणम्।।

(मनु.१/२३)

सृष्टि पदार्थांचे विवेचन करण्याकरिता, तसेच ईश्वराच्या ज्ञानप्राप्तीकरिता, बुद्धिसामर्थ्य संपादन करणे हे वेदाध्ययनाचे प्रयोजन आहे.वेदोत्पत्ती ब्रह्मापासून झाली व व्यासाने संग्रह म्हणजे संहिता केली, असे हल्लीचे पंडित लोक म्हणतात. परंतु हे म्हणणे बरोबर नाही. कारण मनुस्मृतीत ब्रह्मदेवाने अग्नी, वायू, आदित्य व अंगिरा या चार ऋपी पासून वेद शिकून पुढे वेदाचा प्रसार केला, असे लिहिले आहे. ब्रह्मदेवास चतुर्मुख नांव आहे. म्हणून

त्यास खरोखर चार मुखे आहेत, असे नाही. खरोखर चार मुखे असती तर बिचाऱ्या ब्रह्मदेवास मोठे दुःख झाले असते. तो सुखाने निजला असता कसा? तर असे नव्हे, **'चत्वारो वेदाः मुखे यस्य इति चतुर्मुखः'** असा समास केला पाहिजे. प्रथमारंभी ईश्वरीय ज्ञानापासून या चार ऋषींच्या ज्ञानांत वेद प्रकाशित झाले व त्यापासून ब्रह्मदेव शिकला आणि नंतर त्याने सर्व सृष्टीत प्रसार केला आणि त्यापासून मनुष्यास ज्ञान प्राप्त झाले. म्हणून त्यास 'वेद' असे नाव आहे आणि पूर्वी ऋषी एकमेकांपासून श्रवण करीत आले म्हणून 'श्रुती' असे वेदांस नाव आहे.

'अग्निर्वायुरादित्य अंगिरसः' या चार ऋषींस वेद प्रथम प्राप्त झाले. यावर कोणी म्हणेल की हे आदिऋषी चार का होते? एक किंवा अधिक का नव्हते. त्यास ही शंका पाच किंवा तीन असते तरी संभवतो. हा अशोकवाटिका न्याय होईल.

आता कोणी म्हणतील की, वेद आधुनिक आहेत आणि नित्य नाहीत? कारण ब्रह्मदेवाच्या मनामध्ये ज्ञानलहरी उत्पन्न झाली व त्या काळापासून वेदाची परंपरा सांगता येतो, तेंव्हा नित्य कसे? तर असे नव्हे! ईश्वराला अपूर्व ज्ञान आहे आणि ज्ञान रचना नित्य आहे. जसे सृष्टीला तसाच वेदाला आविर्भाव तिरोभाव मात्र आहे, कारण

सूर्य्याचन्द्रमसौ धाता यथापूर्वमकल्पयत्।

(ऋ.सं.१०/१९०/३)

इत्यादी हे वचन ईश्वरीय नित्यज्ञानाचे प्रमाण आहे. ब्रह्मदेवाच्या मागे विराट झाला. त्या मागे वशिष्ठ, नारद, दक्षप्रजापती, स्वायंभुव मनू असे झाले. या सर्व ऋषींच्या मनांत ईश्वराने प्रकाश केला.

आता हे व्याख्यान पुरे करण्यापूर्वी वेदाविषयी साधारण विचार केला पाहिजे.

कोणी म्हणतात की चंद्र सूर्यादिक भूतांची पूजा वेदांत उपदिष्ट आहे. परंतु हे म्हणणे संभवत नाही.

तदेवाग्निस्तदादित्यस्तद्वायुस्तदु चंद्रमाः।
तदेव शुक्रं तद्ब्रह्म ता आपः स प्रजापति।।

(शुक्ल यजुर्वेद ३२/१) तथा–

इन्द्रं मित्रं वरुणमग्निमाहुरथो दिव्यः ससुपर्णोगरुत्मान्।
एकं सद्विप्रा बहुधा वदन्ति(अग्निं यमं मातरिश्वानमाहु)।। (ऋ.सं.१/१६४/४६)

अग्नी, इंद्र, वायू ही सर्व परमेश्वराची नावे आहेत. म्हणून अनेक देवताचा वाद मुळीच संभवत नाही.

प्रशासितारं सर्वेषामणीयांसमणोरपि।
रुक्माभं स्वप्नधीगम्यं विद्यात्तं पुरुषं परम्।।
एतमग्निं वदन्त्येके मनुमन्ये प्रजापतिम्।

इन्द्रमेकेऽपरे प्राणमपरे ब्रह्म शाश्वतम्।।

(मनु.अध्याय १२/१२२/१२३)

परिच्छेद, प्रकार, विकार इत्यादी संबंधाने एका आत्म्याची निरनिराळी नावे संभवतात.

कोणी म्हणतात की, वेदांत बीभत्स कथा आहेत, 'माता च ते पिताच ते' या वचनावर महीधराने भाष्य करून फारच बीभत्स रस उत्पन्न केला आहे. 'गभे' याच्या ठिकाणी वर्ण विपर्यास करून 'भगे' हा शब्द काढला आहे. परंतु या संबंधाने शतपथ ब्राह्मण पाहा–

वृक्ष वृक्षो राज्यं भगश्रीः स्पसोराष्ट्रं श्रीर्वावृक्षस्याग्रम्।

(द्र.शत.१३/२/९/७)

अशी राष्ट्राचे ठिकाणी या वचनाची योजना केली असता, यात बीभत्सपणा उरत नाही.तसेच पुराणांत काश्यपीय प्रजेचे वर्णन आहे. मरीचीचा पुत्र कश्यप आहे. दक्षाच्या साठ कन्या! त्यातील तेरा कन्यांनी कश्यपाशीं लग्न केले, असे वर्णन आहे. या कथेस वेदांत मुळीच आधार नाही. कश्यप म्हणजे आद्यंताच्या विपर्यासाने **'पश्यकः'** परमात्म्याचे नांव आहे.

पश्यकः सर्वदृक् परमात्मा गृहीतः।।

याचप्रमाणे कोणी तरी कांही कथा करून **'ब्रह्मोवाच'** लावून असे पुराणाचे थोतांड रचले आहे. अशा प्रकारचा दुष्ट उद्योग आधुनिक सांप्रदायी लोकांनी फार केला आहे.

ब्रह्मोवाच –

टकाधर्म्मष्टकाकर्म टका हि परमं पदम्।
यस्य गृहे टका नास्ति हा टका टकटकायते।।

या सांप्रदायाचा फार बाजार जमला आहे. त्यायोगे ती दुकानदारी माजली आहे, ती हे सांप्रदायी लोक कशी मोडतील? यजमानाच्या तीन जन्माची हानी झाली, तर त्यांचे काय गेले? जेंव्हा सर्वत्र स्त्री व पुरुष सर्व वेदाचे अवलोकन करतील, तेंव्हा या सांप्रदायाची लटपट बंद होईल. मग कंठीच्या योगाने वैकुंठ मिळण्याचा सोपा मार्ग बंद पडेल. जर एका कंठीने वैकुंठ मिळते, तर कंठ्याची पेंडकी घातल्याने संसारात सुख का मिळू नये? चंदन तिलकाने जर स्वर्ग मिळतो तर सर्व तोंडाला चंदन फासल्याने कांही सुख होऊ नये काय? चंदन, तिलक किंवा कंठी ही सर्व सांप्रदायी लोकांची द्रव्य संपादनाची साधने आहेत, ही खरी तीर्थे नव्हेत. खरी तीर्थे कोणती या विषयी वचन आहे–

अहिंसन् सर्वभूतान्यत्र तीर्थेभ्यः।

(छान्दोग्य उपनिषद् ८/१५/१)

सतीर्थ्यः सब्रह्मचारी विद्याव्रतस्नातः।।

(अष्टा.उदा.६/३/८६–८५) इत्यादी

ब्रह्मचारी पुरुष विद्यास्नात, व्रतस्नात आणि विद्याव्रतस्नात होत असे. यावरून वेदविद्या हेच मुख्य 'तीर्थ' होय. ***

त्रिवार जय-जयकार श्रीरामा...!

– (स्व.) माधवराव देशपांडे

दरवर्षी साजरी होणारी चैत्र शुक्ला नवमी ही तिथी रामनवमी म्हणून सर्वत्र सर्वश्रुत आहे. मर्यादा पुरुषोत्तम श्रीरामाचा जन्म देखील याच चैत्र महिन्यातील शुक्ल नवमीचा...! श्रीरामचरित्राने सम्पूर्ण जगाला प्रभावित केले आहे. तसेच पथभ्रष्ट झालेल्यांना सत्प्रदर्शनाचे कार्य केले आहे. जगात अनेक महापुरुष होऊन गेले, परंतु घराघरात व प्रत्येकाच्या मना-मनांत रामचरित्राने घर केले आहे. दोन व्यक्ती एकमेकांना भेटल्या की 'राम-राम' म्हणतात. आजही ही प्रथा आमच्या खेडेगावात प्रचलित आहे. ब्राह्ममुहूर्ताला 'राम प्रहर' असे म्हणतात. असे हे 'श्रीराम' कितीतरी वर्षांपासून आमचे एक आदर्श मॉडेल बनले आहे.

श्रीरामाचे जीवन हे सर्व प्रकारच्या मर्यादांमध्ये राहुन व्यतीत झाले आहे . ते उत्तम आदर्शांच्या मार्गावरून चालत राहिले. एखाद्या राज्याला सुराज्याचे उदाहरण द्यायचे तर 'राम-राज्य' असे म्हटले जाते. निष्काम कर्म कसे करावे? तर ते रामांसारखे ! 'सुख-दुःखे समं कृत्वा..!' सर्व प्रकारच्या द्वंद्वांमध्ये समतोल राहणे म्हणजे काय तर रामासारखे जगणे. महर्षी वाल्मिकी म्हणतात – 'राज्याभिषेक होणार असे ठरल्यावर आणि लगेच वनवासाचा आदेश प्राप्त झाल्यावर सुद्धा श्रीरामाच्या चेहऱ्यावरील हावभावामध्ये किंचितही फरक दिसून आला नाही.' दुष्टांचा संहार, पतितांचा उद्धार, महिला सन्मान, आदरयुक्त आचरण, अजेय योद्धा, एकबाणी, एकवचनी, एकपत्नी अशा अनेक विशेषणांनी युक्त आदर्श श्रीराम! आयुष्यभर त्यांनी कोणाच्याही राज्याची कामना केली नाही. बालीचे राज्य त्याचा अनुज सुग्रीवाला, तर सुवर्णमय असलेल्या लंकेचे राज्य त्याचाच भाऊ बिभीषणाला अर्पण केले. मातृमोदवर्धक, पितृनिर्देशपालक, एक पत्नीवृत्ती, प्राणप्रियभार्यासखा, लोक संग्राहक, प्रजापालक नरेश, परोपकारी, संसार मर्यादा व्यवस्थापक, पुरुषोत्तम, सूर्यवंशप्रभाकर, जानकीजीवन, सन्मित्र अशा किती तरी विशेषणांनी प्रभू रामचंद्रांचे जीवन नटले आहे.

अनेक चित्रपटानी, प्रसिद्ध दूरदर्शन मालिकांनी श्रीरामाचे चरित्र जनतेच्या घराघरात नेऊन पोहोचवले. त्यामुळे रामायणातील घटनाप्रसंग सर्वश्रुत झाले आहेत. एका चक्रवर्ती राज घराण्यात जन्म घेऊन युवराज पदी आरूढ होऊन सुद्धा, राज घराण्याचा त्याग करुन, वल्कले धारण करुन व केवळ फलाहार ग्रहण करत

१४ वर्षाचा वनवास आनंदाने स्वीकारणे हे काही सामान्याचे काम नव्हे? तर यासाठी पुरुषोत्तमच व्हावे लागते. एवढेच नव्हे तर नुकताच विवाह करुन आलेली, जनकासमान एका राजर्षींची लाडकी सुकन्या सीता ही सुद्धा तितक्याच आनंदाने आपले पतिदेव श्रीरामांसोबत वनवास स्वीकारते. तसेच सतत अगदी सावलीप्रमाणे सोबत राहून आपले ज्येष्ठ बंधू श्रीराम व मातृसमान वहिनी सीता यांचे संरक्षण करणारा उत्तम योद्धा प्रिय लक्ष्मण हा सुद्धा तितकाच महान आहे. ज्येष्ठ बंधू राम वनवासाला निघतात, लक्ष्मण देखील त्यांच्यासोबत येण्याचा क्षणात ठामपणे निर्णय घेतो व १४ वर्षे वनवास पत्करतो. हे सगळे अलौकिकच आहे. म्हणून रामायण साऱ्या जगाला भावणारे प्रेरक काव्य ! आज सुद्धा म्हणजे जवळपास ९ लक्ष वर्षा नंतरही सर्व विरोधी आक्रमणांचा सामना करूनही जगातील अनेक ठिकाणी रामायण व श्रीराम कथा प्रचलित आहे.

रामायणाला ९ लाख वर्षे झाली असे आपण म्हणतो. याला आधार काय ? वायु पुराणात रामायण काळ २४ व्या युगात त्रेतायुगाच्या शेवटी असल्याचा उल्लेख आहे. आज २८ वे युग चालू आहे. हे २८ युग जरी सोडले व फक्त त्रेतायुगाच्या शेवटून काल गणना केली, तर हा काळ ९ लाख वर्षा पेक्षा जास्त होतो. द्वापर युगाचे ८,६४,००० वर्षे व कलियुगाचे ५,१०० वर्षे मिळविले तर ८,६९,१०० वर्षे होतात.

श्री रामाचा राज्याभिषेक चैत्र महिन्यात करावयाचे ठरलें होते. पण त्यांना १४ वर्षे वनवासात जावे लागले. १४ वे वर्ष संपता- संपता रावणाचा वध (फाल्गुन) अमावस्येला झाला होता. व श्रीरामाला भरताच्या भेटीसाठी एक दिवस ही वाया न घालवता भेटणे आवश्यक होते. यासाठीच श्रीराम अयोध्येला पुष्पक विमानातून येतात. म्हणून रामायणानुसार रावण वध चैत्र महिन्यात झालेला दिसून येतो. पण आपली रुढीनुसार काय समजूत आहे ? विजया दशमीला रावण वधाचा कार्यक्रम आयोजित करणे कितपत योग्य आहे?

वनवासातील १४ वर्षाच्या कालखंडात श्रीरामाला अनेक राक्षसांनी विरोध केला, आक्रमण केले. वध करता आला नाही ,म्हणून रावणासारख्या दुष्ट व्यक्तीने त्यांच्या पत्नीचेच कपटाने हरण केले. श्रीरामानी या सर्वांवर मात करुन या आततायी राक्षसांचा वध केला व तिथेही सुराज्य स्थापन केले. विशेष म्हणजे यासाठी त्यानी स्वतःचे सैन्य किंवा राजा जनकाचे, स्वतःच्या श्वसूराचे सैन्य घेतले नाही किंवा मदतही मागितली नाही. स्थानिक लोकांच्या म्हणजेच वनात राहणाऱ्या (वन+नर =वानर) मानव विशेष शूरसैनिकांच्या (सध्याचे वानर नव्हेत !)

साहाय्यानेच युद्ध केले व दुष्टांचा संहार केला.

श्रीराम जोपर्यंत अयोध्येत होते, तोपर्यंत लोकप्रिय युवराज होते. १४ वर्षाचा वनवास पूर्ण करून, राक्षसांचा संहार करून आले, तेव्हा ते मर्यादा पुरुषोत्तम श्रीराम म्हणून ओळखले जाऊ लागले. अशा पुरुषोत्तमाचे आपण सर्वजण वंशज आहोत. हे आमचे केवळ भाग्यच नाही, तर सद्भाग्य आहे. निसर्गाचे वरदान प्राप्त असलेली, सहा ऋतुप्राप्त पुण्य भारतभूमी ! जेथे पुरुषोत्तम श्रीराम व योगेश्वर श्रीकृष्ण यानी जन्म घेतला व ही भूमी पावन झाली, नऊ लाख वर्षानंतरही रामायण हे पहिले आर्ष महाकाव्य, तर पाच हजार वर्षानंतर महाभारत हे दुसरे मौलिक महाकाव्य त्यांच्या चरित्र नायकांमुळे अजरामर ठरले. त्यांच्या एकेका गुणांचे अनुकरण करुन प्रत्येकाने आपापले जीवन सुधारले पाहिजे. प्रभू श्रीरामांची मातृभक्ती, पितृभक्ती, एकवचनी, मर्यादित जीवन, आतातायी राक्षसाचा नायनाट करणे इत्यादी गुणाचे अनुकरण केले पाहिजे. रामांनी सोन्याच्या लंकेवर विजय मिळविला, तरी 'मा गृधः कस्य स्विद्धनम्!' या वैदिक वचनाप्रमाणे अर्थातच हे धन कोणाचे आहे? म्हणजेच आपले नाही ! ते 'क' सुखविशेष परमेश्वराचे आहे. याचे प्रत्यक्ष आचरण करून समाजाला नवदिशा दिली. ही परंपरा व संस्कृती आपण सर्वजण मिळून चिरंतन टिकवून ठेवू या !! सद्गुणांचे सागर व धर्माचे साक्षात मूर्तिमंत प्रतीक असलेल्या प्रभू श्रीरामांना त्रिवार वंदन व विनम्र अभिवादन! त्यांच्या पवित्र जीवन व कार्याचे अनुकरण करून आपण आपले जीवन मंगलमय बनवू या!

(दिवंगत लेखक श्री देशपांडे यांनी हा लेख आपल्या मृत्यूपूर्वी ३० मार्च २०२३ रोजी लिहिला होता.)

(प्रेषिका–श्रीमती नलिनी माधव देशपांडे)

महाराष्ट्र आर्य प्रतिनिधी सभा

मानवता संस्कार व आर्यवीर दल शिबिरे

सभेच्या वतीने मुले व मुलींच्या संस्कार संवर्धनासाठी प्रांतीय सभेतर्फे खालीलप्रमाणे शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे.

दि.२१ ते २७ एप्रिल २०२४ – आश्रमशाळा, वांगजेवाडी, बुधोडा(मुलांसाठी)

दि.२८ एप्रिल ते ११ मे २०२४– सिद्धेश्वर मंदिर परिसर, लातूर(मुलांसाठी)

दि.८ ते १४ मे २०२४ – शारदासदन आश्रमशाळा, नांदगांव(मुलींसाठी)

दि.१२ ते १९ मे २०२४ – छ.शाहु सैनिकी विद्यालय, उदगीर(मुलींसाठी)

यासोबतच सोलापूर व आळंद येथेही शिबिरे होणार आहेत.

तरी पालकांनी आपल्या मुला–मुलींना वरील संस्कार शिबिरात पाठवावे.

धावण्याच्या शर्यतीत गुरुकुलचे ब्रह्मचारी चमकले

शासनाच्या वतीने नुकत्याच तालुका व जिल्हास्तरीय धावण्याच्या स्पर्धा घेण्यात आल्या. यात श्रद्धानंद गुरुकुल परळीच्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट यश संपादित केले. पूर्णा येथील स्पर्धेत काशिनाथ बळीराम आर्य(इ.दहावी) सर्वद्वितीय आलेल्या विद्यार्थ्याने मुंबई येथील राज्यस्तरीय धावण्याच्या स्पर्धेत कामगिरी बजावली. या यशाबद्दल महाराष्ट्र सभेचे उपप्रधान श्री प्रमोदकुमारजी तिवारी यांनी पाच हजार रुपये प्रदान करून त्याचा सत्कार केला. तसेच तालुकास्तरीय धावण्याच्या स्पर्धेत ब्र.आदित्य रंगनाथ घाडगे (३कि.मी.), ब्र. विश्वनाथ भागवत मोरे (दीड कि.मी.) व ब्र. प्रियांशू आर्य (४००मी.)हे तीन विद्यार्थी प्रथम आले, असून ब्र .राचय्या शांतय्या स्वामी हा ८०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत द्वितीय आला आहे. या सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन आर्य समाज परळीचे प्रधान, मंत्री, इतर पदाधिकारी, तसेच गुरुकुलचे आचार्य श्री सत्येन्द्रजी, पू. सोममुनीजी व इतरांनी केले आहे.

सोलापुरात प्रधानपदी बिराजदार तर मंत्रीपदी कट्टे

सोलापुर आर्य समाजाची सर्वसाधारण सभा पं.राजवीर शास्त्री यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली संपन्न झाली. यात आर्य समाजाच्या प्रधानपदी श्री शंकरराव बिराजदार तर मंत्रीपदी श्री रेवणसिद्ध कट्टे यांची एकमताने निवड केली गेली. कार्यकारिणी खालीलप्रमाणे

प्रधान – शंकरराव बिराजदार
उपप्रधान – जनार्धन यन्नम
मंत्री – रेवणसिद्ध कट्टे
उपमंत्री – रवी यन्नम
कोषाध्यक्ष – देविदास उकिरडे
पुस्तकाध्यक्ष– वेदसुमन भोसले
वेदप्रचार अधिष्ठाता – प्रदीप आर्य, सत्यव्रत आर्य व केदार पुजारी
आर्य वीर दल अधिष्ठाता–शरद होमकर, महेश बुधराम
खजिनदार – स्वामी मेघानंदजी
संरक्षक – सुरेश बुरबुरे, राजेंद्र खराडे, नंदकिशोर गांगजी
अंतरंग सदस्य– दत्तात्रय जवळकर, विजय कारेमोल, नरसिंग बांगड, राकेश उदगीरी, नेहा होमकर, नवनीता बुधाराम, कविता कट्टे

विशेष - लातूर येथील आर्य समाजाचा वार्षिकोत्सव उत्साहात पार पाडला. यात अंतिम दिनी परळी गुरुकुलाच्या तीन मुनीजनांचा संन्यास दीक्षा सोहळा अविस्मरणीय ठरला. कार्यक्रमाचा विस्तृत वृत्तांत व विविध बातम्या पुढील अंकात... - संपादक

शोक वार्ता

सौ.विद्यावती राजपूत यांचे निधन

सोलापुर येथील आर्य समाजाच्या सदस्या सौ.विद्यावती किशनसिंह राजपूत(आर्य) यांचे दि.२६ फेब्रुवारी २०२४ रोजी सकाळी दुःखद निधन झाले. मृत्युसमयी त्या ७५ वर्षे वयाच्या होत्या. गेल्या दोन वर्षांपासून त्या अर्धांगवायू आजाराने ग्रस्त होत्या. त्यांच्या पश्चात् पति, ३ मुले, सुना व नातवंडे असा परिवार आहे.

दिवंगत विद्यावती या बार्शी-पानगाव भागातील क्रांतिकारी आर्यधर्मी वेदप्रचारक पं.मनसारामजींच्या शिष्या होत्या. वैदिक ग्रंथाच्या अभ्यासक व सिद्धांतनिष्ठ आर्य कार्यकर्त्या होत्या. त्यांच्या पार्थिवावर सायंकाळी पं.राजवीरजी शास्त्री यांच्या पौरोहित्याखाली पूर्ण वैदिक पद्धतीने अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी पूज्य श्री सोममुनिजी यांच्यासह आर्य कार्यकर्ते उपस्थित होते.

सुशीला पाखरसांगवे यांचे देहावसान

निलंगा येथील आर्य परिवाराच्या सदस्या सुश्री सुशीला नामदेवराव पाखरसांगवे यांचे दि.१९ फेब्रुवारी २०२४ रोजी दुपारी २ वा. दुःखद निधन झाले. मृत्युसमयी त्या ७० वर्षांच्या होत्या. मागील अडीच वर्षांपासून त्या कर्करोगाने आजारी होत्या. ज्येष्ठ आर्य कार्यकर्ते श्री नामदेवरावजी पाखरसांगवे यांच्या ज्येष्ठ कन्या असलेल्या सुशीलादेवी या अविवाहित होत्या. त्यांच्या पार्थिवावर निलंगा येथील सार्वजनिक स्मशानभूमीत वैदिक पद्धतीने अंतिम संस्कार करण्यात आले. परळी गुरुकुलाचे आचार्य श्री सत्येंद्रजींनी हा अंत्यविधी पार पाडला. यावेळी आर्य कार्यकर्ते व परिजन उपस्थित होते.

दिवंगतांच्या शांती व सद्गतीसाठी प्रार्थना आणि भावपूर्ण श्रद्धांजली..!

।।ओ३म्।।

माता निर्माता भवति।

आर्य समाज, परली एवं लोहिया परिवार की ओर से

वन्दनीया माता श्रीमती कौशल्यादेवी रामपालजी लोहिया

के गौरवशाली ९१ वर्षपूर्ति के उपलक्ष्य में

यजुर्वेद पारायण यज्ञ एवं मातृवन्दना समारोह

दि.२४,२५ व २६ मई २०२४(शुक्र., शनि., रवि.)

- *सस्नेह निमंत्रण* -

आप सभी को विदित कराते हुए अत्यन्त हर्ष हो रहा है कि, आर्य समाज की आधारशीला, गुरुकुल आश्रम की सम्पोषिका वंदनीया **माता श्रीमती कौशल्यादेवी रामपालजी लोहिया** के गौरवशाली ९१ वे वर्षपूर्ति के उपलक्ष्य में **'यजुर्वेद पारायण व आयुष्कामेष्टि यज्ञ एवं मातृवन्दना समारोह'** का आयोजन किया गया है। आमंत्रित विद्वान व भजनोपदेशिका –

– ओजस्वी वैदिक वक्ता –

मा.डॉ.महावीरजी आचार्य

प्रतिकुलपति, पतंजलि वि.वि., हरिद्वार

– मधुर भजन संगीत –

मा.श्रीमती अमृता शास्त्री

प्रसिद्ध भजन गायिका,दिल्ली

-* *दि.२४ व २५ मई २०२४* *-

प्रातः ८ से ९.३० –यजुर्वेदपारायण यज्ञ

प्रातः १० से १२ –भजन संगीत एवं प्रवचन

सायं. ४ से ७ – यजुर्वेदपारायण यज्ञ

रात्री ८ से १०–भजन संगीत एवं प्रवचन

-* *मुख्य समारोह* *-

रविवार २६ मई २०२४

प्रातः ८ से ९.३० –आयुष्कामेष्टि यज्ञ

प्रातः १० से ११ – ग्रन्थ तुला एवं गुणगौरव

११ से १ –मातृवन्दना गौरव समारोह

*** आशीर्वाद - पू.स्वामी श्रद्धानन्दजी, डॉ.ब्रह्ममुनिजी, स्वामी सोममुनिजी, स्वामी विद्यानंदजी, ब्रह्मानंदजी, साध्वी आनंदमयी, यज्ञ के ब्रह्मा आचार्य सत्येन्द्रजी**

अतः आप सभी अत्यधिक संख्या में पधारें ! बाहर से पधारनेवालों की भोजन व निवास व्यवस्था की गयी है !



REG.No.MAHBIL/2007/7493*
*Postal No.L/108/RNP/Beed/2021-2023

सेवा में,
श्री. ______________________

____

____

____

प्रेषक -
मन्त्री, महाराष्ट्र आर्य प्रतिनिधि सभा,
आर्य समाज, परली-वैजनाथ.
पिन ४३१ ५१५ जि.बीड (महाराष्ट्र)

यह मासिक पत्र सम्पादक व प्रकाशक श्री मन्त्री, महाराष्ट्र आर्य प्रतिनिधि सभा द्वारा वैदिक प्रिंटर्स, परली वैजनाथ इस स्थानपर मुद्रित कर महाराष्ट्र आर्य प्रतिनिधि सभा के संपर्क कार्यालय आर्य समाज, परली वैजनाथ ४३१५१५ (महाराष्ट्र) इस स्थान से प्रकाशित किया।

मातृ देवो भव !

भावभीनी श्रद्धाञ्जलि !

॥ओ३म्॥

महर्षि दयानन्द सरस्वती के परम अनुयायी, वैदिक सिद्धान्तों के अध्येता
दानशूर आर्य कार्यकर्ता श्री समाधान लक्ष्मीकांतजी पाटिल
व सौ. कविता समाधान पाटिल
मु. पो. सावखेडा (खुर्द) ता. जि. जलगांव एवं पाटिल परिवार
की ओर से अपनी पूजनीया दादीमाँ
स्व. श्रीमती गुंदरबाई किशनरावजी पाटिल
इनकी पावन स्मृति में
वैदिक गर्जना मासिक का रंगीन मुखपृष्ठ भेंट